संकेतस्थळावरील अधिसूचना

# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO: २१००१:२०१८) (ISO/IES: २७००१-२०१३)

शासकीय तंत्रनिकेतन इमारत, चौथा मजला, ४९, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

दूरध्वनी क्र.: ०२२-६२५४२१००

Email: director@msbte.com Web: www.msbte.ac.in

जा.क्र.मरातंशिमं/का-५४/अ. मु. अ./२०२५-२६/ ५३८८ दिनांक: 10 SEP 2025

## अधिसूचना

**महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाचे अखत्यारीत असलेले अल्पमुदतीचे व्यवसायाभिमुख पदविका अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून सुरु करणेबाबत.**

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या अखत्यारीत नसलेल्या तथापि महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या अखत्यारितील शासन मान्य विविध प्रकारच्या अल्प मुदतीच्या व्यावसायिक पदविका अभ्यासक्रमांसाठी नविन संस्था सुरु करणे, अस्तित्वात असलेल्या संलग्नित संस्थामंध्ये नविन अभ्यासक्रम सुरु करणे, अभ्यासक्रमांची अदलाबदल करणे, प्रवेशक्षमतेत वाढ / घट/ बदल करणे, संस्थेच्या नावांत बदल करणे, संस्थेच्या व्यवस्थापनात बदल करणे, संस्थेचे स्थानांतरण करणे तसेच अभ्यासक्रम/संस्था बंद करणेसाठी संस्थांकडून प्रस्ताव फक्त online पध्दतीने मागविण्यात येत आहेत.

२. सदर प्रस्ताव सादर करताना अर्जदार संस्थांनी महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या www.msbte.ac.in या संकेत स्थळावरील मान्यता प्रक्रिया पुस्तिके (Approval Process Manual) मधील नमुद अभ्यासक्रमांकरीता ऑनलाईन प्रस्ताव विहित नमुन्यात आवश्यक त्या कागदपत्रांसह Upload करावेत. मान्यता प्रक्रिया पुस्तिका मंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

३. ऑनलाईन प्रस्ताव भरताना प्रक्रिया शुल्क (Processing fee) रु. २५,०००/- विहित मुदतीत ऑनलाईन पद्धतीने भरणे आवश्यक आहे. तसेच विलंब शुल्कासह प्रस्ताव सादर करावयाचा असल्यास रु. ३०,०००/- Online पध्दतीने विहित मुदतीत भरणे आवश्यक आहे.

४. **<u>प्रस्ताव सादर करणे व त्याअनुषंगिक प्रक्रियेबाबतचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.</u>**

| अ.क्र. | तपशिल | कालावधी |
|---|---|---|
| १ | (अ) ट्रस्ट/सोसायटी/कंपनी/संस्था यांचा प्रस्ताव/अर्ज online पध्दतीने आवश्यक ती कागदपत्रे upload करुन submit करणे | दि. ११.०९.२०२५ ते दि. १८.०९.२०२५ |
| | (ब) ट्रस्ट/सोसायटी/कंपनी/संस्था यांचा प्रस्ताव/अर्ज online पध्दतीने आवश्यक ती कागदपत्रे upload करुन **विलंब शुल्कासह** submit करणे | दि. १८.०९.२०२५ते दि. २१.०९.२०२५ |
| २ | संस्थेच्या प्रतिनिधीने संबंधित विभागीय कार्यालयात पडताळणी समितीसमोर मूळ कागदपत्रांसह उपस्थित रहाणे व विभागीय कार्यालयाकडून संस्थांना त्रुटी (असल्यास) कळविण्याचा कालावधी | दि. १९.०९.२०२५ ते दि. २२.०९.२०२५ |
| ३ | संस्थांनी त्रुटी पुर्ततेचा अहवाल (आवश्यक त्या कागदपत्रांसह) विभागीय कार्यालयाकडे सादर करण्याचा कालावधी | दि. २०.०९.२०२५ते दि. २४.०९.२०२५ |
| ४ | पात्र संस्थेतील पायाभूत सुविधांच्या भौतिक पडताळणी तज्ञ समितीद्वारे करण्याचा कालावधी | दि. २२.०९.२०२५ते दि. २९.०९.२०२५ |
| ५ | विभागीय स्तरीय समितीद्वारे भौतिक तज्ञ समितीचे अहवाल पडताळणी व संकलीत करुन मंडळास सादर करण्याचा कालावधी | दि. ३०.०९.२०२५ ते दि. ०१.१०.२०२५ |
| ६ | राज्यस्तरीय समितीद्वारे विभागीय स्तरीय समितीच्या शिफारशींची पडताळणी करुन मान्यतेसाठी शासनास सादर करण्याचा कालावधी | दि. ०३.१०.२०२५ ते दि. ०७.१०.२०२५ |

**सूचना:**

१. विहित केलेल्या मान्यता प्रक्रिया पुस्तिकेनुसार नविन संस्थांना मान्यता देणेबाबत, तसेच अस्तित्वात असलेल्या संलग्नित संस्थांमध्ये नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, प्रवेशक्षमतेत वाढ/बदल करणे, संस्थेच्या नावात बदल करणे, संस्थेच्या व्यवस्थापनात बदल करणे, संस्था स्थानांतरण करणे, अभ्यासक्रम/संस्था बंद करणे तसेच अभ्यासक्रमांची अदलाबदल करणे याबाबत कार्यवाही केली जाईल. संस्थेने मान्यता प्रक्रिया पुस्तिके मधील नमूद सूचना काळजीपुर्वक वाचाव्यात व त्यानुसार आवश्यक ती माहीती अचूक भरण्याबाबतची कार्यवाही करावी. मान्यता प्रक्रिया पुस्तिकेत नमूद केलेले अभ्यासक्रम व स्पष्टीकरण टीप (Note) याचे अर्ज भरण्यापूर्वी काळजीपूर्वक अवलोकन करावे.

२. संस्थांनी online पध्दतीने भरलेल्या अर्जाची सही व शिक्का असलेली मूळ (Original) प्रत तसेच त्या अर्जा सोबत upload केलेल्या हमीपत्राची (Undertaking)मूळ (Original) प्रत विभागीय कार्यालयास छाननीच्या वेळी सादर करुन जमा करावी

३. संस्था प्रतिनिधींनी छाननी समितीच्या तपासणी नंतर त्रुटींची पूर्तता करुन त्रुटी पूर्ततेचा अहवाल वेळापत्रकानुसार संबंधित विभागीय कार्यालयाकडे सादर करावा. अन्यथा अर्ज अपूर्ण समजून त्यावर पुढील कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही.

४. कागदपत्रे पडताळणी समिती मार्फत पडताळणीनंतर परीपूर्ण असणाऱ्या प्रस्तावांच्या अनुषंगाने आवश्यक शैक्षणिक सोयी सुविधा तसेच पायाभूत सुविधा संस्थेत उपलब्ध असल्याची तपासणी तज्ञ समितीमार्फत उपरोक्त नमुद कालावधी दरम्यान करण्यात येईल.

५. Approval Process Manual मध्ये नमूद केलेल्या अभ्यासक्रमांव्यतिरीक्त सद्या अस्तित्वात असलेल्या संस्था इतर अभ्यासक्रम राबवित असल्यास अशा संस्थांनी अभ्यासक्रमांच्या अदलाबदलासाठी (Replacement of Courses) अर्ज ऑनलाईन पद्धतीने करणे आवश्यक आहे.

६. मंडळाच्या अखत्यारीतील शासनमान्य अल्पमुदतीचे अभ्यासक्रम हे कायम विनाअनुदानित तत्वावर असून सदर अभ्यासक्रमांकरीता कोणत्याही प्रकारचे अनुदान शासनामार्फत देय असणार नाही.

७. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. टिईडी-२००९/(३३६/०९)/ तांशि-५, दिनांक १५-०७-२००९ अन्वये मंडळाच्या अखत्यारीतील अल्पमुदतीच्या शासन मान्य (Non-AICTE) पदविका अभ्यासक्रमांना कोणत्याही प्रवर्गातील विद्यार्थ्यांना तसेच आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या विद्यार्थ्यांना शुल्क — प्रतिपुर्ती योजना लागू राहणार नाही.

८. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता प्रसिद्ध करण्यात आलेल्या अधिसूचनेसंबंधी माननीय उच्च न्यायालय ,मुंबई ,औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल करण्यात आलेली W.P. क्र. ९८३४/२०२४ ही याचिका मा. न्यायालयामार्फत निकाली काढण्यात आलेली असल्याने **शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता** ही अधिसूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे.

९. मंडळाच्या दिनांक २९ ऑगस्ट, २०२४ रोजी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता प्रसिद्ध करण्यात आलेल्या अधिसूचनेस अनुसरून प्रस्ताव सादर केलेल्या संस्थाना शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता प्रस्ताव सादर करावयाचा असल्यास विहित पद्धतीने प्रस्ताव पुन्हा सादर करणे अनिवार्य आहे. तथापि संस्थेने प्रकिया शुल्क भरलेले असल्यास या वेळी पुन्हा प्रकिया शुल्क भरण्याची आवश्यकता असणार नाही. त्याकरिता ऑनलाईन पद्धतीने प्रस्ताव सादर करतेवेळी यापूर्वी भरलेल्या प्रक्रिया शुल्काची पावती अपलोड करावी.

१०. महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाचा अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमासाठीचा बृहत आराखडा ( Perspective Plan) मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्यामध्ये जिल्हानिहाय उदयोगक्षेत्रांना लागणाऱ्या कौशल्य क्षेत्रांची माहिति नमूद आहे.

११. या अधिसूचनेच्या संदर्भाने प्रस्ताव सादर करणाऱ्या संस्थांना शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये शासनाकडून प्राप्त होणाऱ्या मान्यतेस अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील सर्व शैक्षणिक कामकाज मंडळाने विहित केलेल्या शैक्षणिक वेळापत्रकानुसार विहित कालावधीत पूर्ण करावयाचे असल्याने सदर बाब मान्य असल्याबाबतचे, हमीपत्र संस्थेने प्रस्ताव सादर करताना जमा करणे आवश्यक आहे.

१२. कोणत्याही संस्थेने शासनमान्यता व मंडळाची संलग्नता मिळाल्याशिवाय विद्यार्थ्यांचे प्रवेश करु नयेत. मान्यता/संलग्नता मिळाल्याखेरीज विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यास, त्यास संपूर्णत: संस्था जबाबदार राहील.

**महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या विभागीय कार्यालयांची माहिती:-**

| अ.क्र. | विभागीय कार्यालयाचे नाव व पत्ता | विभागांतर्गत येणारे जिल्हे | दूरध्वनी क्रमांक | ई-मेल |
|---|---|---|---|---|
| १ | उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, मुंबई, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पुर्व) मुंबई-४०००५१ | मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | दूरध्वनी क्र. (०२२) ६२५४२१११ | dysecretary_rbtemu@msbte.com |
| २ | उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, पुणे, ४१२-ई, बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११०१६ | पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर | दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६९९४ २५६६०३१९ | dysecretary_rbtepn@msbte.com |
| ३ | उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, नागपूर, शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर - ४४०००१ | नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, भंडारा ,वर्धा, यवतमाळ, अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा | दूरध्वनी क्र. (०७१२) ६६०३८७५/ ७६/७७/७८ | dysecretary_rbteng@msbte.com |
| ४ | उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, शासकीय तंत्रनिकेतन परिसर, स्टेशन रोड, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर-४३१००५ | छ. संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, लातूर, धाराशिव, नांदेड, बीड, नाशिक, धूळे, जळगांव, अहिल्यानगर, नंदूरबार | दूरध्वनी क्र. (०२४०) - २३३४०२५ | dysecretary_rbteau@msbte.com |

(डॉ. प्रमोद नाईक)
संचालक
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.